ePaper
‖ वर्ष - 8 । अंक - 53 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖
महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com ‖ गुरुवार, दिनांक 29 ऑगस्ट 2024 ‖ पुणे आवृत्ती ‖ mahaenews.com ‖ maha_enews ‖ Mahaenews

## एकनाथ शिंदेंनी दीपक केसरकरांना दिली समज



### आतील पानांत


- रिवाबा जडेजाची पूरामध्ये उतरून मदत
- श्रद्धा कपूर राहणार भाड्याने
- समाजाला आत्मपरिक्षण करण्याची गरज
- १२ औद्योगिक स्मार्ट शहरे बनवणार


## छत्रपतींच्या पुतळाप्रकरणावरुन महायुतीविरोधात आक्रमक भूमिका

# आघाडीचे रविवारी ‘जोडे मारो’ आंदोलन!

### ‘मातोश्री’वर महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांची बैठक

। पुणे । महाईन्यूज

**मुंबई : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणच्या राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजीमहाराज यांचा पुतळा कोसळण्याच्या घटनेवरून आक्रमक झालेल्या विरोधी पक्षांच्या महाविकास आघाडीने महायुतीच्या विरोधात ‘जोडे मारो आंदोलना’ची हाक दिली आहे. एक सप्टेंबरला गेटवे ऑफ इंडियाजवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ आंदोलन करण्यात येणार आहे. त्यानंतर दोन सप्टेंबरपासून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात आणि तालुक्यात आंदोलन केले जाणार आहे.**



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वांद्रे येथील ‘मातोश्री’ निवासस्थानी महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांची बुधवारी बैठक झाली. या बैठकीला उद्धव यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले उपस्थित होते. यावेळी विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपाबाबत चर्चा झाल्याचे समजते. विधानसभेच्या २८८ जागांपैकी अनेक जागांवरून तिन्ही पक्षांत रस्सीखेच सुरू आहे. शिवाय छोट्या घटक पक्षांनाही सामावून घ्यायचे आहे. यासंदर्भात तिन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाल्याचे समजते.

या बैठकीनंतर तिन्ही नेत्यांनी पत्रकार परिषद घेऊन एक सप्टेंबरच्या आंदोलनाची घोषणा केली. यावेळी जागावाटपावर भाष्य करणे त्यांनी टाळले. राजकोट किल्ल्यावर घडलेला प्रसंग दुर्दैवी असून, यामागे भाजपचे गलिच्छ राजकारण असल्याचा आरोप या नेत्यांनी केला. एक सप्टेंबरला दुपारी एक वाजता हुतात्मा स्मारकाला वंदन करून गेटवे ऑफ इंडियाजवळील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ महायुती सरकारच्या प्रतिमेला ‘जोडे मारो आंदोलन’ केले जाणार आहे.

‘राज्यातील सरकार हे महाराष्ट्रद्रोही आणि शिवद्रोही आहे. यांच्या नसानसांत शिवद्रोह ठासून भरला असून, महाराष्ट्रातील जनता ते सहन करणार नाही,’ असे उद्धव ठाकरे म्हणाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सिंधुदुर्ग जिल्हाधिकाऱ्यांचा दाखला देऊन ताशी ४५ किमी वेगाच्या वाऱ्यांमुळे पुतळ्याचे नुकसान झाल्याचे म्हटले होते. या विधानाचा ठाकरे यांनी समाचार घेतला. ‘मुख्यमंत्र्यांनी दिलेले कारण निर्लज्जपणाचे आहे. महाराष्ट्राचे माजी राज्यपाल हे समुद्रकिनारी राजभवनावर राहत होते. त्यांनीही महाराजांचा अपमान केला होता; पण समुद्रावरील जोरदार वाऱ्यांमुळे माजी राज्यपाल कोश्यारी यांची टोपी उडाली, असे माझ्या तरी वाचनात कुठे आले नाही,’ असा टोला ठाकरे यांनी या वेळी लगावला.

‘राज्य सरकारने नौदलावर जबाबदारी ढकलण्याचा प्रयत्न केला आहे; पण आपले नौदल इतके पोकळ नाही. त्यांना समुद्रकिनारी वाहणाऱ्या वाऱ्यांचा अंदाज असतो. लोकसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून, कोकण जिंकायचे या ईर्ष्येने घाईघाईत मालवणला कार्यक्रम घेण्यात आला. नवख्या शिल्पकाराकडून ठरावीक वेळेत पुतळा करून घेण्यासाठी दबाव टाकला गेला. समुद्रकिनारी पुतळा उभारताना कोणती काळजी घ्यावी, याचा अभ्यास केला नाही,’ अशी टीकाही ठाकरे यांनी केली.

‘छत्रपती शिवाजी महाराजांचा सातत्याने अपमान करण्याची भाजप युतीच्या नेत्यांची हिंमत होते कशी,’ असा सवाल नाना पटोले यांनी केला. ‘भ्रष्टाचाराचा कलंक लागलेल्या एका खासदाराने महाराजांचा जिरेटोप पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या डोक्यावर चढवून महाराजांचा अपमान केला. आता मुख्यमंत्री म्हणतात, यापेक्षा मोठा पुतळा बसवू. या कमिशनखोर सरकारला अक्कल कधी येणार? राज्यात आज महिला, शाळेतील मुलीही सुरक्षित नाहीत. जनतेत सरकारविरोधात आक्रोश आहे. घाबरलेले सरकार जनतेचा उठाव होऊ नये यासाठी प्रयत्न करत आहे,’ असे पटोले म्हणाले.

### ‘भ्रष्टाचाराने टोक गाठले’

‘पंतप्रधान मोदींनी अनावरण केलेला पुतळा कोसळणे दुर्दैवी आहे. ही घटना पाठीशी घालण्यासाठी विविध विधाने केली जात आहेत. त्यावरून भ्रष्टाचार किती टोकाला गेला आहे, हे दिसते. लोकांमध्ये सरकारविरोधात तीव्र भावना आहे. त्यामुळे आम्ही सरकारचा निषेध करणार आहोत,’ असे शरद पवार यांनी या वेळी सांगितले.

### छत्रपतींच्या पुतळ्यावरुन राजकरण तापले?

मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा कोसळल्याच्या घटनेनंतर, वाईटातून चांगलं घडावे, म्हणून हा अपघात घडला असावा, असे वक्तव्य राज्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी केले होते. केसरकर यांच्या या वक्तव्यानंतर त्यांच्यावर चोहीकडून टीका केली जात असून बुधवारी त्यांनी मुंबईत पत्रकार परिषदेत या सर्व प्रकरणाबाबत स्पष्टीकरण दिले. यावेळी ते म्हणाले, सर्वात आधी नौदलाची स्थापना करणारे छत्रपती शिवाजी महाराज होते. आपल्या देशाचे संरक्षण दल असलेल्या नौदलाचा आम्हाला अभिमान आहे. त्यामुळे त्यांच्या कर्तृत्वाला शोभेल असेच काम व्हायला हवे. राजकारण कोणीच करू नये नवा पुतळा लवकरात लवकर उभारला जावा ही माझी मागणी आहे.

# पाटलांचा राष्ट्रवादीत प्रवेश कठीण?

## इंदापूर तालुक्यात पक्षाकडे अनेक ताकदवान उमेदवार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी विधानसभा निवडणुकीत इंदापूरची जागा अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडे जाण्याची शक्यता असल्याने इंदापूरचे माजी आमदार हर्षवर्धन पाटील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाणार असल्याची चर्चेने जोर धरला असला तरी, पाटील यांचा संभाव्य पक्षप्रवेश सोपा नसल्याचे दिसून येत आहे. पवार यांच्या गटात असलेल्या इच्छुक उमेदवारांना डावलून पाटील यांना उमेदवारी देण्याची शक्यता कमी असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.**

इंदापूर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडे अनेक ताकदवान उमेदवार आहेत. लोकसभा निवडणुकीत खासदार सुप्रिया सुळे यांना इंदापूर विधानसभा मतदारसंघातून पंचवीस हजारांचे मताधिक्य मिळाल्याने या मतदारसंघात पवार यांची ताकद असल्याचेही स्पष्ट झाले आहे. या मतदार संघात इंदापूर महापालिकेचे नगराध्यक्ष, कर्मयोगी कारखान्याचे उपाध्यक्ष, इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव, अर्बन बँकेचे अध्यक्ष अशा विविध पदांवर काम केलेले शहा कुटुंबातील मुकुंद शहा, भरत शहा, माजी नगराध्यक्ष अंकिता शहा या शरद पवार गटात आहेत. सोनाई उद्योग समूहाचे संचालक प्रवीण माने यांनी काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहे. जिल्हा बँकेचे संचालक अप्पासाहेब जगदाळे हेदेखील उमेदवारीच्या शर्यतीमध्ये आहेत. पवार गटाकडे असलेले हे संभाव्य उमेदवार पाहता पाटील यांचा पक्षप्रवेश होईल आणि त्यांना उमेदवारी मिळेल, याची शक्यता कमी असल्याचे बोलले जाते.इंदापूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास हर्षवर्धन पाटील इच्छुक आहेत. मात्र हा मतदारसंघ महायुतीमधील राष्ट्रवादी काँग्रेसकडे जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे इंदापूरमधून अपक्ष निवडणूक लढवावी, असा दबाव पाटील समर्थकांकडून टाकला जात आहे. त्यासाठी 'इंदापूर विकास आघाडी'ची स्थापनाही करण्यात आली आहे. मात्र काही दिवसांपासून पाटील हे शरद पवार यांच्या संपर्कात असल्याची चर्चा इंदापूर तालुक्यात सुरू झाली. त्यातच पवार आणि हर्षवर्धन भेट झाली. पाटील यांनी ही भेट राजकीय नसल्याचे स्पष्टीकरण दिले असले तरी, त्याची चर्चा सुरू झाली आहे. पण, पाटील यांच्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसमधील प्रवेश फारसा सोपा नाही. ते केवळ दबावतंत्राचा वापर करत असल्याचेही बोलले जात आहे. सन २०१४ च्या निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर गेल्या निवडणुकीपूर्वी पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. ऑक्टोबर २०१९ मध्ये झालेल्या निवडणुकीत त्यांना पराभव स्वीकारावा लागला. मात्र गेल्या पाच वर्षांपासून ते भाजपमध्ये



### 'इंदापूर विकास आघाडी'ची स्थापना

इंदापूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास हर्षवर्धन पाटील इच्छुक आहेत. मात्र हा मतदारसंघ महायुतीमधील राष्ट्रवादी काँग्रेसकडे जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे इंदापूरमधून अपक्ष निवडणूक लढवावी, असा दबाव पाटील समर्थकांकडून टाकला जात आहे. त्यासाठी 'इंदापूर विकास आघाडी'ची स्थापनाही करण्यात आली आहे. मात्र काही दिवसांपासून पाटील हे शरद पवार यांच्या संपर्कात असल्याची चर्चा इंदापूर तालुक्यात सुरू झाली. त्यातच पवार आणि हर्षवर्धन भेट झाली. पाटील यांनी ही भेट राजकीय नसल्याचे स्पष्टीकरण दिले असले तरी, त्याची चर्चा सुरू झाली आहे.

सक्रिय असून भाजपने त्यांना राष्ट्रीय साखर महासंघाचे अध्यक्षपद दिले आहे. हे पद मोठे असल्याने पाटील भाजप सोडण्याचा विचार करणार नाहीत, असा अंदाजही व्यक्त केला जात आहे.इंदापूर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडे अनेक ताकदवान उमेदवार आहेत. लोकसभा निवडणुकीत खासदार सुप्रिया सुळे यांना इंदापूर विधानसभा मतदारसंघातून पंचवीस हजारांचे मताधिक्य मिळाल्याने या मतदारसंघात पवार यांची ताकद असल्याचेही स्पष्ट झाले आहे. या मतदार संघात इंदापूर महापालिकेचे नगराध्यक्ष, कर्मयोगी कारखान्याचे उपाध्यक्ष, इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव, अर्बन बँकेचे अध्यक्ष अशा विविध पदांवर काम केलेले शहा कुटुंबातील मुकुंद शहा, भरत शहा, माजी नगराध्यक्षा अंकिता शहा या शरद पवार गटात आहेत. सोनाई उद्योग समूहाचे संचालक प्रवीण माने यांनी काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहे. जिल्हा बँकेचे संचालक अप्पासाहेब जगदाळे हेदेखील उमेदवारीच्या शर्यतीमध्ये आहेत. पवार गटाकडे असलेले हे संभाव्य उमेदवार पाहता पाटील यांचा पक्षप्रवेश होईल.

# जुन्नरमध्ये महाविकास आघाडीत बंडखोरी?

## 'सांगली पॅटर्न' राबविण्याचे विश्वजीत कदम यांचे संकेत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यातील जुन्नर विधानसभा मतदारसंघात उमेदवारीवरून रस्सीखेच सुरू झाली असतानाच महाविकास आघाडीमध्ये बंडखोरी होण्याची शक्यता आहे. जुन्नर मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसकडे आहे.**

मात्र काँग्रेसचे नेते सत्यशील शेरकर या मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास इच्छुक असल्याने जुन्नरमध्ये सांगली पॅटर्न राबविला जाण्याची शक्यता आहे. त्याबाबतचे संकेत काँग्रेसचे आमदार डॉ. विश्वजीत कदम यांनी दिले आहेत. त्यामुळे जुन्नर मध्ये महाविकास आघाडीत बंडखोरी होईल, अशी चर्चा सुरू झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अतुल बेनके जुन्नरचे आमदार आहेत. मात्र गेल्या काही महिन्यांपासून त्यांची शरद पवार यांच्याबरोबरची जवळीक वाढली आहे. ते राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करणार असल्याचीही चर्चा जुन्नर तालुक्यात सुरू आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसमध्येही अस्वस्थता निर्माण झाली आहे. काँग्रेसचे युवा नेते सत्यशील शेरकर निवडणूक लढविण्यास



### आघाडीमध्ये बंडखोरी होण्याची शक्यता

त्यामुळे जुन्नरमध्ये 'सांगली पॅटर्न' राबविला जाईल, असे डॉ. कदम यांनी स्पष्ट केले.लोकसभा निवडणुकीत सांगली पॅटर्न चर्चेत आला होता. सांगलीची जागा काँग्रेसकडे असताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने तेथे उमेदवारी जाहीर केला होता. त्यामुळे सांगलीमधून काँग्रेसचे विशाल पाटील यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवित विजय मिळविला होता. विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला जुन्नरची जागा न मिळाल्यास येथे बंडखोरी होण्याची शक्यता आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यातील जुन्नर विधानसभा मतदारसंघात उमेदवारीवरून रस्सीखेच सुरू झाली असतानाच महाविकास आघाडीमध्ये बंडखोरी होण्याची शक्यता आहे. जुन्नर मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसकडे आहे.

इच्छुक आहेत. या पार्श्वभूमीवर शेरकर आणि डॉ. विश्वजीत कदम यांची पुण्यात एका बैठकीनिमित्ताने भेट झाली. या बैठकीत जुन्नर विधानसभा मतदारसंघाबाबत चर्चा करण्यात आली. महाविकास आघाडीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडे हा मतदारसंघ असल्याने शेरकर यांची अडचण झाली आहे.

## शिरुर लोकसभेतून शिवसेनेची 'मशाल' मैदानाबाहेर!

# 'तुतारी'कडे इच्छुकांचा ओढा!

### खासदार डॉ. अमोल कोल्हेंमुळे लोकसभेला काम करूनही शिवसेना 'गारद' : सहाही मतदार संघांमध्ये 'तुतारी'कडे तगडे उमेदवार!

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीतील यशानंतर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार डॉ. आमोल कोल्हे यांनी शिरुर लोकसभा मतदार संघात 'मिशन तुतारी' सुरू केले आहे. मतदार संघातील सहाही विधानसभा मतदार संघात पक्षाकडे तगडे उमेदवार असल्यामुळे शिवसेना ठाकरे गटाला 'मशाल' चिन्हावर उमेदवारीसाठी झगडावे लागणार आहे.**



माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी 2004, 2009 आणि 2014 असे सलग तीनवेळा शिरुर लोकसभा मतदार संघामध्ये शिवसेनेचे (धनुष्यबाण) वर्चस्व राखले होते. मात्र, 2019 मध्ये डॉ. अमोल कोल्हे यांनी या वर्चस्वाला सुरूंग लावला. राष्ट्रवादीच्या तिकीटावर त्यांनी मतदार संघ खेचून आणला. त्यानंतर शिवसेना व राष्ट्रवादी दोन्ही पक्षांमध्ये मोठी फूट पडली. तरीही डॉ. अमोल कोल्हे यांनी शिवसैनिकांच्या जोरावर विजयाची 'तुतारी' वाजवली.

दरम्यान, आगामी विधानसभा निवडणुकीत शिरुरमधून दोन्ही शिवसेना हद्दपार होण्याची चिन्हे आहेत. कारण, या दोन्ही पक्षांकडे स्थानिक पातळीवर तगडे उमेदवार नाहीत. खेड विधानसभा मतदार संघामध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाकडे अतुल देशमुख, सुधीर मुंगसे असे तगडे उमेदवार आहेत. देशमुख यांना डॉ. कोल्हे यांचा 'ग्रीन सिग्नल' आहे. या दोन्ही उमेदवारांच्या तुलनेत शिवसेना ठाकरे गटाकडे तोडीचा उमेदवार नाही.

जुन्नरमध्ये विद्यमान आमदार अतुल बेनके यांनी "पवार साहेब आमचे कुटुंबप्रमुख आहेत" असा दावा केला. या ठिकाणी शिंदे गटाचे शरद सोनवणे, भाजपाच्या आशा बुचके रिंगणात आहेत. 'पॉलिटिकल बॅलन्स' करीत अतुल बेनके 'तुतारी'च्या वाटेवर गेले, तर आश्चर्य वाटायला नको. विशेष म्हणजे, जुन्नरमधून डॉ. अमोल कोल्हे यांचे कट्टर समर्थक सत्यशील शेरकर काँग्रेसकडून निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे या ठिकाणीसुद्धा 'मशाल' पेटण्यासाठी संधी नाही. आंबेगावमध्ये भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे संचालक देवदत्त निकम यांना डॉ. अमोल कोल्हे यांनी मध्यंतरी जाहीर कार्यक्रमामध्ये "भावी आमदार" असे घोषित केले होते. त्यामुळे निकम यांची उमेदवारी निश्चित मानली जाते. याच कार्यक्रमात शिवसेना ठाकरे गटाच्या सुरेश भोर आणि राजाराम बाणखेले यांनी संताप व्यक्त केला होता. यावरुन ठाकरे गटाची 'मशाल' आंबेगावमध्ये पेटणार नाही, ही बाब अधोरेखित होते.

शिरुर- हवेली विधानसभा मतदार संघामध्ये विद्यमान आमदार अशोक पवार शरद पवार गटासोबत आहेत. त्यामुळे ही जागा 'तुतारी'कडेच राहील यात शंका नाही. किंबहुना ठाकरे गटाला या ठिकाणीसुद्धा सक्षम उमेदवार नाही.

हडपसर विधानसभा मतदारसंघात दोन्ही इच्छुक उमेदवार अनुक्रमे प्रशांत जगताप व प्रमोद भानगिरे हे अनुक्रमे राष्ट्रवादी (शरद पवार गट) आणि शिवसेना (शिंदे गट) चे शहर अध्यक्ष आहेत. महायुतीत आणि महाविकास आघाडीच्या घटक पक्षामुळे उमेदवारीसाठी रस्सीखेच होऊ शकते. कारण, विद्यमान आमदार आमदार चेतन तुपे हे अजित पवार गटात आहेत. आता महाविकास आघाडीकडून प्रशांत जगताप यांची उमेदवारी 'तुतारी' चिन्हावर निश्चित मानली जात आहे. अलिकडेच ठाकरे गटात प्रवेश केलेले माजी नगरसेवक वसंत मोरे यांची लोकसभा निवडणुकीत 'डिपॉझिट' जप्त झाली आहे. त्यांनी राजकीय पुनर्वसन करण्यासाठी ठाकरे गटात प्रवेश केला. पण, विधानसभा उमेदवारीबाबत प्रशांत जगताप यांचे पक्षातील वजन पाहता वसंत मोरे यांच्या रुपाने 'मशाल'ला उमेदवारीसाठी 'कात्रजचा घाट' दाखवण्यात येईल, असे राजकीय जाणकार सांगतात. लोकसभा निवडणुकीमध्ये डॉ. अमोल कोल्हे यांच्या विजयासाठी निष्ठवंत शिवसैनिकांनी जीवाचे रान केले. मात्र, आता विधानसभा निवडणुकीत ठाकरे गटाच्या निष्ठावंतांना 'निवडून येण्याची क्षमता' या निकषावर बाजुला केले जाते का? अशी खंत शिवसैनिकांकडून बोलून दाखवली जात आहे.

### भोसरीत ठाकरे गटाला वाव आहे, पण संधी नाही..!

भोसरी विधानसभा मतदार संघात अजित पवार गटातून शरद पवार गटात दाखल झालेले अजित गव्हाणे यांनी जोरदार तयारी सुरू केली. त्यानंतर माजी नगरसेवक रवि लांडगे यांनी शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला आहे. मात्र, निष्ठावंत शिवसैनिक सुलभा उबाळे आणि धनंजय आल्हाट हेसुद्धा निवडणुकीसाठी इच्छुक असल्यामुळे महाविकास आघाडीच्या उमेदवारीवरुन संभ्रम आहे. परंतु, खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी अजित गव्हाणे यांच्यामागे ताकद उभा केली. काही दिवसांपूर्वी सुलभा उबाळे यांच्या पुढाकाराने आयोजित केलेल्या 'जनसंवाद' मेळाव्यास डॉ. कोल्हे यांनी दांडी मारली होती. उमेदवारीच्या तीव्र दावेदार असलेल्या सुलभा उबाळे यांचा प्रचारही काही दिवसांपासून थंडावलेला पहायला मिळतो. त्यामुळे 'तुतारी'ला जागा सोडल्यास आम्ही काम करणार नाही, असे म्हणणाऱ्या सुलभा उबाळे यांनी उमेदवारी घोषित होण्यापूर्वीच 'तडजोडी' केल्याची चर्चा निष्ठावंत शिवसैनिकांमध्ये सुरू झाली आहे. दुसरीकडे, किमान ५० हजार मते एकगट्टा मतदार असलेल्या ठाकरे गटामध्ये इच्छुकांची संख्या जास्त आणि निष्ठावंत असा तिढा निर्माण होणार असल्यामुळे या मतदार संघातही शिवसेना ठाकरे गटाला वाव राहील, असे चित्र नाही.

---

## पार्थ पवार यांचे 'मिशन पिंपरी-चिंचवड', नवीन शहराध्यक्षपदासाठी पाच नावे चर्चेत!

### दहीहंडी उत्सवाच्या निमित्ताने लावली हजेरी; शहरात संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी प्रयत्न

। पिंपरी । अविनाश आदक : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीत अपयशी ठरलेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला निवडणुकीनंतर भोसरी विधानसभा मतदारसंघातूनही मोठा धक्का सहन करावा लागला होता. कारण, भोसरी विधानसभेवर भाजपचे दोन टर्म आमदार महेश लांडगे असल्याने अजित गव्हाणे यांना विधानसभा लढविण्याची संधी नव्हती. त्यामुळे भोसरी विधानसभा लढविण्यासाठी अजित गव्हाणे यांच्यासह काही नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला. पिंपरी-चिंचवड शहरात झालेली पक्षीय पडझड दुरुस्त करण्यासाठी आणि शहरात आपले वर्चस्व पुन्हा निर्माण करण्यासाठी अजित पवार यांनी चिरंजीव पार्थ पवार यांना मैदानात उतरवल्याचे पाहायला मिळत आहे.**



गेल्या काही दिवसांपासून पार्थ पवार यांनी पिंपरी-चिंचवड शहरात अगदी शांततेने कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेण्यास सुरवात केली आहे. शहरातील विविध कार्यक्रमांना ते हजेरी लावत आहेत. त्याचबरोबर पत्रकार व जाणकारांच्या भेटीगाठीही ते घेत आहेत. काल झालेल्या दहिहंडी उत्सवाच्या निमित्तानेही पार्थ यांनी पिंपरी-चिंचवडचा दौरा केला. पक्षसंघटना शहरात बळकट करण्यासाठी पार्थ पवार ॲक्टिव्ह झाले असून, पक्षाच्या पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष पदासाठी पिंपरी विधानसभेचे आमदार अण्णा बनसोडे, माजी महापौर मंगला कदम, माजी विरोधी पक्षनेते राजू मिसाळ व माजी नगरसेवक जगदीश शेट्टी यांच्या नावांची चर्चा आहेत. हे सर्व नेते राष्ट्रवादी काँग्रेस व त्यातल्या त्यात अजित पवार यांचे अनेक वर्षांपासूनचे सहकारी आहेत. पक्षाला यांच्यापैकी शहराध्यक्ष मिळाला, तर शहर संघटना बळकट होईल, असा विश्वास कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे.

### विधान परिषदेवर कुणाला संधी?

विधानसभा व विधानपरिषद स्तरावर पक्षाची ताकद वाढविण्यासाठी माजी आमदार विलास लांडे, माजी महापौर योगेश बहल आणि माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांना राज्यपाल नियुक्त विधानपरिषद सदस्यपद देऊन पिंपरी चिंचवडचा बालेकिल्ला पुन्हा काबीज करण्याचा अजित पवार प्रयत्न करतील, असे राजकीय जाणकार सांगतात. विलास लांडे हे राष्ट्रवादी काँग्रेसचे जुने जाणकार नेते आहेत. तसेच, भोसरी व खेड विधानसभा मतदार संघावर महायुतीची पकड मजबूत करण्यासाठी त्यांचा प्रामुख्याने विचार जाऊ शकतो. त्याचबरोबर चिंचवड आणि पिंपरीतून नाना काटे व योगेश बहल यांनाही विधानपरिषदेवर संधी देण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. अजित पवार यांचा पारंपरिक बालेकिल्ला राहिलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात पुन्हा दबदबा निर्माण केला जाऊ शकतो. अजित पवार येत्या काळात काय प्रयत्न करणार का? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# जम्मू-काश्मीरमधले असेही ‘विलीनीकरण’!



## भूमिका

**केंद्रात ‘एनडीए-३.०’ सरकार स्थापन झाल्यापासून भाजपप्रणीत केंद्र सरकारला अनेक निर्णय मागे का घ्यावे लागत आहेत, याची चर्चा वक्फ विधेयक, उच्चपदांवर थेट भरतीची जाहिरात, ब्रॉडकास्ट दुरुस्ती विधेयक, भांडवली नफ्यावरील करआकारणी पद्धत या प्रसंगांतून पुढे जाते आहेच.**

त्यावर, हे निर्णय सरकारचे होते, आघाडी सरकार चालवताना तडजोडी कराव्या लागतात, घटक पक्षांचा दबाव असतो असा युक्तिवाद असू शकतो. लोकसभेत भाजपकडे बहुमत नसल्याने मोदींच्या नेतृत्वाखाली सरकारसमोर अडचणी येत असतील तर ‘मध्यममार्ग काढला गेला असेल’ असेही म्हणता येईल. पण आता भाजपला पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या उपस्थितीत घेतले गेलेले पक्षाचे निर्णयही मागे घ्यावे लागत असतील तर हा भाजपला मिळालेला काव्यगत न्याय म्हणायचा की आणखी काही हे ज्याचे त्याने ठरवावे. याचे उदाहरण असे की, जम्मू-काश्मीरमधील विधानसभा निवडणुकीच्या ४४ उमेदवारांची यादी घोषित केल्यानंतर पक्षांतर्गत रोषापुढे नमते घेऊन दोन तासांमध्ये ही यादीच मागे घ्यावी लागली. मोदी-शहांची पोलादी पकड असलेल्या या पक्षामध्ये उघड ‘बंडखोरी’ व्हावी आणि केंद्रीय नेतृत्वाला एक पाऊल तात्पुरते का होईना मागे घ्यावे



लागावे ही घटना ‘ऐतिहासिक’च म्हटली पाहिजे! जगातील सर्वात मोठ्या राजकीय पक्षामध्ये काळ कसा सोकावला असेही कोणी विचारू शकेल. झाले असे की, जम्मू आणि काश्मीर विभागांतील तीनही टप्प्यांतील उमेदवारांची सोमवारी भाजपने घोषणा केली. या यादीत बाहेरून आलेल्या नेत्यांचा भरणा झाल्याचे दिसताच भाजपचे जुने ‘संस्कारी’ नेते संतापले. आम्ही वर्षानुवर्षे पक्षासाठी खस्ता खाल्ल्या आणि आता सहा महिने -वर्षापूर्वी आलेल्या आयारामांना तुम्ही उमेदवारी कशी देऊ शकता, असा प्रश्न करत हे नेते जम्मूमधील भाजपच्या कार्यालयात घुसले. त्यांच्या असंतोषाचा भडका इतका की, प्रदेशाध्यक्ष रवींद्र रैना यांचा परिस्थिती आटोक्यात आणण्याचा प्रयत्न अपयशी ठरला. रैनांचा नाइलाज झाला होता, वास्तविक त्यांचेच नाव यादीत नव्हते. दोन माजी उपमुख्यमंत्र्यांनाही वगळले गेले होते. रैनांनाच उमेदवारी मिळेल की नाही याची शाश्वती नव्हती तर ते इतर नेत्यांची काय समजूत काढणार? अखेर जम्मू भाजपमधील हा वणवा दिल्लीत पोहोचला, अचानक हल्लाबोल झाल्याने गांगरलेल्या केंद्रीय नेत्यांनी यादीच मागे घेऊन स्वत:ला वाचवले. मग, जिवात जीव आल्यावर पहिल्या टप्प्यापुरती १६ उमेदवारांची नवी यादी जाहीर केली गेली.जम्मूमधील नेते-कार्यकर्त्यांच्या उद्रेकातून एक गोष्ट स्पष्ट झाली की, भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाच्या आयारामांना मिठी मारण्याच्या धोरणाला पक्षांतर्गत कडाडून विरोध होऊ लागला आहे. भाजपच्या कार्यकर्त्यांचा हा राग महाराष्ट्रात निराळ्या प्रकारे दिसला. लोकसभा निवडणुकीमध्ये कार्यकर्त्यांमधील निरुत्साहामागे हेदेखील प्रमुख होते असे मानले जाते. भाजपमधील आयारामांचा हा विषाणू थेट जम्मू-काश्मीरपर्यंत पसरला ही पक्षासाठी धोक्याची घंटा म्हणता येईल. हा विषाणू पक्षाला पोखरून काढत असेल तर केंद्रीय नेतृत्वाने सावध होण्याची गरज आहे. पण कदाचित दिल्लीत बसलेल्या नेत्यांचा अहंकार आड येत असावा असे दिसते. भाजपने मंगळवारी दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यांतील मिळून २९ उमेदवार जाहीर केले. त्यात एखादा अपवाद वगळता आदल्या दिवशी मागे घेतलेल्या यादीतील २८ उमेदवार कायम आहेत. यापैकी १२ हून अधिक ‘आयाराम’- म्हणजे गेल्या पाच वर्षांतच भाजपमध्ये आले आहेत. एखाद-दोघांनी तर गेल्या आठवड्यात पक्षात प्रवेश केला आहे. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांचे बंधू देविंदर सिंह राणादेखील अलीकडेच नॅशनल कॉन्फरन्समधून भाजपमध्ये आले. पक्षामध्ये कष्टकरी असतात हे खरे, तेच मतदारांना मतपेटीपर्यंत घेऊन येतात हेही खरे; पण निवडणुकीत विजय मिळवायचा असेल तर दुसऱ्या पक्षातून आलेल्या ताकदवान नेत्यांना संधी द्यावीच लागेल, हे गेल्या दहा वर्षांतील धोरण भाजपने जम्मू-काश्मिरातही कायम ठेवले असे दिसते. महाराष्ट्रातील एक-एक आयाराम विधानसभा निवडणुकीत भाजपला रामराम करण्याच्या मन:स्थितीत आहेत.

## प्रासंगिक »

### पुतळ्याचा प्रश्न!

***देशास एकेकाळी नेतृत्व देणारा महाराष्ट्र आज त्या पुतळ्याप्रमाणे किरकोळ वाऱ्यांत उन्मळून पडलेला दिसतो...***

नव्या संसदेचे छत का गळते? नव्या मंदिरात पाणी का टपकते? नवा भुयारी मार्ग पाण्याखाली जातो कसा? याच मालिकेत नवा कोरा पुतळा पायांपासून उखडला जातोच कसा, असा प्रश्न विचारता येईल. हे सगळे प्रश्न वेगवेगळ्या प्रांतातील घटनांसंदर्भात असले तरी त्या सगळ्यांचे उत्तर एकच एक आहे. ते ‘मी’, ‘माझ्या हस्ते’ आणि ‘माझ्या कारकीर्दीत’ या तीन ‘मीं’भोवती फिरते.सेतूचा वा संसदेच्या नव्या इमारतीच्या उद्‌घाटनाचा वा राम मंदिराचा असो! देश हा कालातीत असतो आणि त्याचे नेतृत्व करण्याची संधी मिळालेली व्यक्ती कितीही देदीप्यमान, दैवी वगैरे असली तरी तिच्या कार्यकालास कालमर्यादा असतात. कोणताही मानव मर्त्य असतो आणि देश अनादी-अनंत. अशा वेळी आपल्या आधी कित्येक वर्षे आणि आपल्यानंतरही कित्येक वर्षे सुखासमाधानाने अस्तित्व टिकवून असलेल्या या देशाच्या कार्यकालावर आपली प्रतिमा निर्माण करण्याचा, छाप सोडण्याचा कोणी कितीही प्रयत्न केला.

काही राज्यांच्या राज्यपालांची अनावश्यक कृती आणि हस्तक्षेप लोकशाहीच्या दृष्टीने चिंतेत भर घालणारे आहेत. मग ती विधानसभेने पारित केलेल्या विधेयकांना मान्यता देणे असो, मंत्रिमंडळाने सुचवलेल्या व्यक्तीचा मंत्रिमंडळात समावेश असो. यासंबंधी विरोधकांनीच नव्हे तर आजीमाजी न्यायाधीशांनी खंत व्यक्त केली.

# राज्यपाल न्यायिक पुनरावलोकनाच्या कक्षेत

काही दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायाधीश नागरत्ना आणि माजी न्यायाधीश नरिमन यांनी राज्यपालांच्या कृतीबाबत आक्षेप नोंदवले. देशाच्या सर्वोच्च न्यायालयातील न्यायिक सदस्यांचे हे भाष्य प्रकरणाचे गांभीर्य वाढवणारे आहे. न्यायाधीश सहसा आपल्या निकालातून भाष्य करतात. पण काही राज्यपालांच्या कृतीवर आजीमाजी न्यायाधीशांनी केलेली जाहीर टीका ही दखल घेण्याजोगी आहे.गेल्या सहा महिन्यांत न्यायाधीश नागरत्ना यांनी सार्वजनिक व्यासपीठावरून राज्यपालांच्या भूमिकेबाबत अनेकदा खंत व्यक्त केली. या महिन्यात एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी काही राज्यांच्या राज्यपालांच्या नको तिथे अति तत्परता आणि अनावश्यक निष्क्रियतेकडे लक्ष वेधले. घटनादत्त अधिकारांचे राज्यपालांकडून पालन न होणे याविषयी त्यांनी खेद व्यक्त केला. मार्च महिन्यातील एका कार्यक्रमात त्यांनी ‘राज्यपालांना



काय करावे आणि करू नये हे सांगावे लागते. आता राज्यपालांनी घटनेने दिलेल्या अधिकारातून आपले कर्तव्य पार पाडावे हे सांगण्याची गरज आहे,’ असे मत व्यक्त केले.डिसेंबर २०२३ मध्ये एका खासगी संस्थेच्या कार्यक्रमात सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश नरिमन यांनी २०२३ सालची तिसरी अस्वस्थ करणारी घटना म्हणून काही राज्यपालांच्या कार्यपद्धतीवर आक्षेप घेतला. केरळ विधानसभेने संमत केलेल्या एका विधेयकावर राज्यपालांनी २३ महिने कुठलाच निर्णय न घेतल्याचा संदर्भ दिला. सर्वोच्च न्यायालय भविष्यात कधीतरी स्वतंत्र विचारसरणीचे लोक राज्यपाल म्हणून नियुक्त केले जावेत असा निकाल देईल, याची मी वाट बघतो आहे अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. न्या. नागरत्ना, न्या. नरिमन हे काही कुठल्या राजकीय पक्षाशी निगडित नाहीत. यांची हयात सांविधानिक अधिकारांच्या कायदेशीर प्रक्रियेत गेलेली आहे. यांच्यासारख्या अनेक मान्यवरांची बांधिलकी ही कुठल्याही व्यक्ती अथवा पक्षाशी नाही तर संविधानाशी आहे. घटनातज्ज्ञ असांविधानिक कृतींवर बोट ठेवतात तेव्हा त्याला विशेष महत्त्व प्राप्त होते. म्हणूनच या दोन्ही न्यायाधीशांचे विधान गांभीर्याने घेणे गरजेचे आहे.राज्यपालांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाचे काही निकाल याबाबत सखोल विश्लेषण करणारे आहेत. कायदा, सांविधानिक तरतुदी राज्यपालांना संरक्षण बहाल करतात, परंतु राज्यपालांच्या संविधानाला अभिप्रेत नैतिक आचरणाच्या अभावातून करण्यात आलेली ही निरीक्षणे सुदृढ लोकशाहीसाठी गरजेची आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# लाडकी बहीण योजना थांबवावी का?

## सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला खडसावलं

| मुंबई |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सर्वोच्च न्यायालयाने पुण्यातील पाषाण येथील जमीन अधिग्रहण प्रकरणावरुन पुन्हा एकदा महाराष्ट्र सरकारची कानउघडणी केली आहे. लवकरात लवकर भरपाईचा योग्य मसुदा घेऊन या, अन्यथा आम्ही लाडकी बहीण योजनेसारख्या राज्य सरकारने सुरू केलेल्या इतर मोफत योजना थांबवण्याबाबत गांभीर्याने विचार करावा लागेल, असं न्यायालयाने म्हटलं आहे. पुण्यातील भूमी अधिग्रहण प्रकरणाच्या एका खटल्यात सर्वोच्च न्यायलाने महाराष्ट्र सरकारला खडे बोल सुनावले आहेत.**



पुण्यातील पाषाण परिसरातील खासगी मालकीची जमीन अधिग्रहित केल्यानंतर राज्य सरकारने मूळ जमीन मालकांना त्या जमिनीचा योग्य मोबदला दिलेला नाही. त्यामुळे जमीन मालकांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. या प्रकरणी आज (२८ ऑगस्ट) न्यायमूर्ती बी. आर. गवई, न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा व न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.जमीन अधिग्रहण केल्यानंतर लोकांना त्यांचा मोबदला दिला जात नाही, मात्र लाडकी बहीणसारख्या मोफत योना मात्र चालू आहेत. असं असल्यास आम्ही लाडकी बहीण योजना थांबवावी का? असा प्रश्न खंडपीठाने उपस्थित केला आहे. या सुनावणीवेळी खंडपीठाने लाडकी बहीण योजनेसह राज्य सरकारच्या इतर मोफत योजनांचा उल्लेख केला. व राज्य सरकारने या प्रकरणी तातडीने नवं प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.वन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेश कुमार यांनी या प्रकरणात लक्ष घालावं आणि पुढील सुनावणीला उपस्थित राहावं असेही निर्देशही खंडपीठाने दिले आहेत. खंडपीठाने राजेश कुमार यांना समन्स बजावलं आहे. वन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रातील काही टिप्पण्या प्रथमदर्शनी अवमानकारक असल्याचं खंडपीठाने म्हटलं आहे. तसेच याप्रकरणी याआधी दिलेल्या आदेशांचे पालन करण्याच्या सूचना देखील दिल्या आहेत. महाराष्ट्रातील शिंदे-फडणवीस-पवार सरकारने राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची घोषणा केली होती. या योजनेद्वारे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमधील महिलांना दर महिन्याला सरकार १५०० रुपयांचा हप्ता दिला जाणार आहे. राज्याच्या बहुतांश भागातील महिलांना या योजनेच्या पहिल्या व दुसऱ्या हप्त्याचे पैसे मिळाले आहेत.याचिकाकर्ते टी. एन. गोदाबर्मन यांच्या पूर्वजांनी पुण्यात २४ एकर जमीन खरेदी केली होती. राज्य सरकारने अलीकडेच ही जमीन ताब्यात घेतली. मात्र, याचिकाकर्त्यांना मोबदला दिला नव्हता. सरकारने ही जमीन डिफेन्सच्या शिक्षासंकुलाला देण्यास सांगितलं. ज्यानंतर याचिकाकर्त्यांनी न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने मोबदला देण्याचे आदेश दिले. त्यावेळी राज्य सरकारने न्यायालयाला सांगितलं की आम्ही त्या व्यक्तीला मोबदला म्हणून जमीन दिली आहे. प्रत्यक्षात संबंधित व्यक्तीला वनजमीन देण्यात आली आहे. त्यानंतर याचिकाकर्त्याने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात राज्य सरकारला प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. खासगी मालकीची जमीन अधिग्रहित केल्यानंतर राज्य सरकारने मूळ जमीन मालकांना त्या जमिनीचा योग्य मोबदला दिलेला नाही. त्यामुळे जमीन मालकांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. या प्रकरणी आज (२८ ऑगस्ट) न्यायमूर्ती बी. आर. गवई, न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा व न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.जमीन अधिग्रहण केल्यानंतर लोकांना त्यांचा मोबदला दिला जात नाही, मात्र लाडकी बहीणसारख्या मोफत योना मात्र चालू आहेत. असं असल्यास आम्ही लाडकी बहीण योजना थांबवावी का? असा प्रश्न खंडपीठाने उपस्थित केला आहे.

### पुढील सुनावणीला उपस्थित राहावं

या सुनावणीवेळी खंडपीठाने लाडकी बहीण योजनेसह राज्य सरकारच्या इतर मोफत योजनांचा उल्लेख केला. व राज्य सरकारने या प्रकरणी तातडीने नवं प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.वन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेश कुमार यांनी या प्रकरणात लक्ष घालावं आणि पुढील सुनावणीला उपस्थित राहावं असेही निर्देशही खंडपीठाने दिले आहेत. प्रतिज्ञापत्रातील काही टिप्पण्या प्रथमदर्शनी अवमानकारक असल्याचं खंडपीठाने म्हटलं आहे.

# राज्यातील १३ कोटी जनतेची माफी मागतो

## शिवरायांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी अजित पवारांची प्रतिक्रिया

| मुंबई |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा कोसळल्याची घटना घडल्यानंतर राज्यभरातून संताप व्यक्त करण्यात येत आहे. यावरून राज्यात राजकीय वातावरण तापलं आहे. सत्ताधारी आणि विरोधी पक्षात आरोप-प्रत्यारोप सुरू असून विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना घेरलं आहे.**

यातच आज मालवण येथील राजकोट किल्ल्यावर तब्बल दोन तास शिवसेना ठाकरे गट आणि भाजपाच्या नेत्यांमध्ये राडा झाल्याचं पाहायला मिळालं. दरम्यान, या घटनेला जे जबाबदार असतील त्यांच्यावर गुन्हे दाखल झाले असून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल, असं स्पष्टीकरण राज्य सरकारकडून देण्यात आलं आहे.

आता यावर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही संबंधितांवर कडक करवाई करण्यात येणार असल्याचं सांगितलं. तसेच "राज्यातील १३ कोटी जनतेची मी माफी मागतो", असंही अजित पवार यांनी म्हटलं आहे. ते आज एका कार्यक्रमात बोलत होते. दोन तीन दिवसांपूर्वी राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी



महाराजांचा पूर्णाकृती पुतळा वाऱ्यामुळे कोसळला. मात्र, यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्या सर्वांच्या चौकशा केल्या जातील. आता काही बातम्या येत आहेत की हे त्यांनी केलं किंवा यांनी केलं. आता कोणी काय केलं? याचा सर्व तपास लागला पाहिजे. यामध्ये मी राज्याचा उपमुख्यमंत्री म्हणून सांगतो. मी याबाबत महाराष्ट्रातील १३ कोटी जनतेची माफी मागतो. छत्रपती शिवाजी महाराज हे आपल्या सर्वांचे दैवत आहेत. मात्र, त्यांचा पुतळा अशा प्रकारे कोसळणे हे सर्वांना धक्का बसणारे आहे. यामध्ये जे कोणी दोषी असतील मग ते कोणीही असूद्या. वरिष्ठ अधिकारी असुद्या किंवा कंत्राटदार असुद्या. त्या कंत्राटदाराला तर काळ्या यादीत टाकलं पाहिजे", असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे.

### फडणवीसांनी काय प्रतिक्रिया दिली?

राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा कोसळल्याच्या घटनेवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली. फडणवीस म्हणाले, "मालवणच्या घटनेवर कुणीच राजकारण करू नये, ही माझी विनंती आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळणे ही दुःखद घटना आहे. अशा घटनांची योग्य चौकशी करून कोण दोषी आहेत, हे समोर आले पाहिजे. त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे आणि त्याठिकाणी पुन्हा भव्य असा पुतळा उभारला गेला पाहिजे. आम्ही या तीनही गोष्टींवर लक्ष केंद्रीत केलं आहे. नौदलाने ही बाब गांभीर्याने घेतली असून चौकशी समिती तयार केली आहे.

# 12 औद्योगिक स्मार्ट शहरे बनवणार!

## 9 राज्यांमध्ये 12 स्मार्ट औद्योगिक शहरे तयार करण्यास मंजुरी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज (२८ ऑगस्ट) मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत देशातील विविध प्रश्नांसंदर्भात चर्चा करण्यात आली. यावेळी केंद्र सरकारने देशातील १२ औद्योगिक स्मार्ट शहरांना मंजुरी दिली. या निर्णयानुसार, ९ राज्यांमध्ये १२ स्मार्ट औद्योगिक शहरे तयार करण्यात येणार आहेत. या माध्यमातून तब्बल १० लाख तरुणांना रोजगार मिळणार असल्याचं केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं आहे.**



केंद्र सरकारच्या या निर्णयानुसार, नॅशनल इंडस्ट्रियल कॉरिडॉर डेव्हलपमेंट प्रोग्राम (NICDP) अंतर्गत या १२ स्मार्ट औद्योगिक शहरे तयार करण्यात येणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असल्याचं सांगितलं जात आहे. या प्रकल्पासाठी केंद्र सरकार तब्बल २८,६०२ कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून देशांतर्गत उत्पादनाला चालना देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितली आहे.देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने सरकारने एक महत्त्वाचे पाऊल उचलले असल्याचं सांगण्यात येत आहे. दरम्यान, केंद्र सरकारने देशातील १२ औद्योगिक स्मार्ट शहरांना मंजुरी दिली. यामध्ये उत्तराखंडमधील खुरपिया, महाराष्ट्रातील दिघी, केरळमधील पलक्कड, पंजाबमधील राजपुरा-पटियाळा, उत्तर प्रदेशमधील आग्रा आणि प्रयागराज, बिहारमधील गया, तेलंगणामधील झहीराबाद, आंध्र प्रदेशमधील ओरवाकल व कोपर्थी, राजस्थानमधील जोधपूर व पाली या शहरांचा समावेश करण्यात आला आहे. दरम्यान, केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार, देशातील १२ औद्योगिक स्मार्ट शहरांना मंजुरी देण्याच्या निर्णयामुळे आता देशातील औद्योगिक स्मार्ट शहरांची सख्याही वाढेल. तसेच या शहरामध्ये जागतिक दर्जाची ग्रीनफिल्ड औद्योगिक स्मार्ट शहरे उभारली जातील.

या औद्योगिक स्मार्ट सिटी प्रकल्पात सुमारे १० लाख लोकांना रोजगार मिळेल. याचबरोबर ३० लाख अप्रत्यक्षपणे नवीन रोजगार निर्माण होतील, असं केंद्र सरकारने स्पष्ट केलं आहे.आज केंद्र सरकारने देशातील १२ औद्योगिक स्मार्ट शहरांना मंजुरी देण्याचा निर्णय घेतला. याचवेळी अजून दुसरेही काही महत्वाचे निर्णय घेतले. आज मंत्रिमंडळाने ६,४५६ कोटी रुपयांच्या अंदाजे खर्चासह एकूण २९६ किलोमीटर लांबीच्या तीन मोठ्या रेल्वे पायाभूत प्रकल्पांनाही मंजूरी दिली आहे.

या प्रकल्पांमुळे रेल्वे कनेक्टिव्हिटी मोठ्या प्रमाणात वाढेल आणि प्रादेशिक विकासाला चालना मिळेल.विशेषत: ओडिशाच्या नुआपड़ा आणि झारखंडच्या पूर्व सिंगभूम या जिल्ह्यांना फायदा होणार आहे.केंद्र सरकारच्या या निर्णयानुसार, नॅशनल इंडस्ट्रियल कॉरिडॉर डेव्हलपमेंट प्रोग्राम (NICDP) अंतर्गत या १२ स्मार्ट औद्योगिक शहरे तयार करण्यात येणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असल्याचं सांगितलं जात आहे. यामध्ये उत्तराखंडमधील खुरपिया, महाराष्ट्रातील दिघी, केरळमधील पलक्कड, पंजाबमधील राजपुरा-पटियाळा, उत्तर प्रदेशमधील आग्रा आणि प्रयागराज, बिहारमधील गया, तेलंगणामधील झहीराबाद, आंध्र प्रदेशमधील ओरवाकल व कोपर्थी, राजस्थानमधील जोधपूर व पाली या शहरांचा समावेश करण्यात आला आहे. देशातील १२ औद्योगिक स्मार्ट शहरांना मंजुरी देण्याच्या निर्णयामुळे आता देशातील औद्योगिक स्मार्ट शहरांची सख्याही वाढेल. तसेच या शहरामध्ये जागतिक दर्जाची ग्रीनफिल्ड औद्योगिक स्मार्ट शहरे उभारली जातील. या औद्योगिक स्मार्ट सिटी प्रकल्पात सुमारे १० लाख लोकांना रोजगार मिळेल. याचबरोबर ३० लाख अप्रत्यक्षपणे नवीन रोजगार निर्माण होतील, असं केंद्र सरकारने स्पष्ट केलं आहे.

### मोठ्या रेल्वे पायाभूत प्रकल्पांनाही मंजूरी

.आज केंद्र सरकारने देशातील १२ औद्योगिक स्मार्ट शहरांना मंजुरी देण्याचा निर्णय घेतला. याचवेळी अजून दुसरेही काही महत्वाचे निर्णय घेतले. आज मंत्रिमंडळाने ६,४५६ कोटी रुपयांच्या अंदाजे खर्चासह एकूण २९६ किलोमीटर लांबीच्या तीन मोठ्या रेल्वे पायाभूत प्रकल्पांनाही मंजूरी दिली आहे. या प्रकल्पांमुळे रेल्वे कनेक्टिव्हिटी मोठ्या प्रमाणात वाढेल आणि प्रादेशिक विकासाला चालना मिळेल. विशेषत: ओडिशाच्या नुआपड़ा आणि झारखंडच्या पूर्व सिंगभूम या जिल्ह्यांना फायदा होणार आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज (२८ ऑगस्ट) मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत देशातील विविध प्रश्नांसंदर्भात चर्चा करण्यात आली. यावेळी केंद्र सरकारने देशातील १२ औद्योगिक स्मार्ट शहरांना मंजुरी दिली.

# समाजाला प्रामाणिकपणे आत्मपरिक्षण करण्याची गरज

## बस आता खूप झालंः राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची संतप्त प्रतिक्रिया

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देशात महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. काही दिवसांपूर्वी कोलकाता येथील डॉक्टर तरुणीवर बलात्कार करत तिची हत्या करण्यात आली होती. तसेच बदलापूर येथे दोन चिमुकल्या मुलींवर लैंगिक अत्याचाराचं प्रकरण पुढं आलं होतं. याशिवाय इतरही राज्यातून अशाच प्रकारच्या घटना पुढे आल्या आहेत. या घटनांनंतर नागरिकांनी रस्त्यावर उतरून आंदोलन सुरू केलं आहे.**



देशभरात संतापाची लाट उसळली आहे. दरम्यान, या घटनांवर आता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीही भाष्य केलं आहे.राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पीटीआय या वृत्तसंस्थेला यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. कोलकाता येथील घटना वेदनादायक आणि भयावह आहे. बस आता खूप झालं. ज्यावेळी कोलकाता येथे विद्यार्थी, डॉक्टर आणि नागरिक आंदोलन करत होते, तेव्हा या प्रकरणातील आरोपी खुलेआम फिरत होते, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या.पुढे बोलताना, कोणताही सुसंस्कृत समाज मुलींवर अशाप्रकारे अत्याचार होऊ देऊ शकत नाही. समाजाला आता प्रामाणिकपणे आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. नागरिकांनी स्वत:ला कठीण प्रश्न विचारण्याची आवश्यकता आहे. समाजाची दयनीय मानसिकता महिलांना कमी लेखते. १२ वर्षांपूर्वी झालेल्या निर्भया प्रकरणानंतर अशा बऱ्याच घटना घडल्या आहेत. मात्र, समाजाने याकडे दुर्लक्ष केलं.

### देशभरात संतापाची लाट

आपल्या समाजाला सामूहिक स्मृतिभ्रंशाचा त्रास झाल्याचे दिसून येते, या संकटाचा आपण सर्वांनी मिळून सामना केला पाहिजे, अशी प्रतिक्रियाही राष्ट्रपतींनी दिली.९ ऑगस्टला एक महिला डॉक्टर आर. जी. कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातल्यासेमिनार हॉलमध्ये मृतावस्थेत आढळली. तिचा मृतदेह अर्धनग्न अवस्थेत होता. तिच्या मृतदेहाचं शवविच्छेदन करण्यात आलं तेव्हा तिच्यावर बलात्कार झाला असल्याची बाब समोर आली. तिच्या शरीरावर आणि गुप्तांगावर अनेक जखमा होत्या. तिच्या डोळ्यांमधूनही रक्त वाहात होतं. ही घटना समोर आल्यानंतर देशभरात संतापाची लाट उसळली.

# आई जया बच्चन व बहिणीसह दिसला अभिषेक बच्चन

बॉलीवूडचे महानायक अमिताभ बच्चन यांचा मुलगा अभिषेक व सून ऐश्वर्या राय (AISHWARYA RAI BACHCHAN) यांच्या नात्यात दुरावा आल्याच्या चर्चा मागच्या वर्षभरापासून होत आहेत. ऐश्वर्याने बिग बींचं घर सोडलं असून ती आई वृंदा राय यांच्याबरोबर राहतेय, मुलगी आराध्यादेखील तिच्याबरोबर राहते, असं म्हटलं जात आहे. अशातच अभिषेकचा आई जया बच्चन (JAYA BACHCHAN) व बहीण श्वेता बच्चन (SHWETA BACHCHAN) यांच्याबरोबरचे व्हिडिओ व्हायरल होत आहेत.अभिषेक बच्चन, त्याची आई जया बच्चन आणि बहीण श्वेता बच्चन मंगळवारी रात्री एकत्र मुंबईत पोहोचले. त्यांचे मुंबई विमानतळावरून बाहेर पडतानाचे अनेक व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. इन्स्टाग्रामवर 'विरल भयानी' या पापाराझी अकाउंटवरून एक व्हिडिओ शेअर करण्यात आला आहे. या व्हिडिओमध्ये अभिषेकने विमानतळातून बाहेर पडताना पापाराझींना हात जोडले. अभिवादन केले आणि त्याच्या कारकडे चालत गेला. तर, जया



बच्चन त्यांच्या कारकडे चालत गेल्या आणि श्वेता पापाराझींकडे बघत हसून निघून गेली.या व्हिडीओवर नेटकरी विविध प्रकारच्या कमेंट्स करत आहेत. काहींना ऐश्वर्या व आराध्या कुठे आहेत, असं विचारलं आहे तर काहींनी श्वेता नंदा सतत बच्चन कुटुंबाबरोबर का असते असं विचारलं आहे. 'अभिषेक आपल्या आई व बहिणीबरोबर फिरतो, आराध्या व ऐश्वर्या एकट्या फिरायला जातात,' 'ऐश्वर्या कुठे आहे?' 'आम्हाला वाटायचं नणंद आल्याने भांडणं फक्त सामान्य कुटुंबात होतात,' अशा कमेंट्स या व्हिडिओवर युजर्सनी केल्या आहेत.बॉलीवूडचे महानायक अमिताभ बच्चन यांचा मुलगा अभिषेक व सून ऐश्वर्या राय यांच्या नात्यात दुरावा आल्याच्या चर्चा मागच्या वर्षभरापासून होत आहेत. ऐश्वर्याने बिग बींचं घर सोडलं असून ती आई वृंदा राय यांच्याबरोबर राहतेय, मुलगी आराध्यादेखील तिच्याबरोबर राहते, असं म्हटलं जात आहे.

## दीपक तिजोरी कमावतो बक्कळ पैसे

९० च्या दशकातील लोकप्रिय अभिनेते दीपक तिजोरी आता मोठ्या पडद्यापासून दूर आहेत. एकेकाळी हिरोआधी त्याच्या मित्र किंवा भावाच्या भूमिकेसाठी निर्माते दीपक तिजोरी यांना घ्यायचे. अनेक चित्रपटांमध्ये त्यांनी सहाय्यक भूमिका करून लोकांच्या हृदयावर राज्य केले आहे. दीपक तिजोरी यांचा आज वाढदिवस आहे. त्यांचा जन्म २८ ऑगस्ट १९६१ रोजी मुंबईत झाला. ते ६३ वर्षांचे झाले आहेत. त्यांना सहायक भूमिका करून इंडस्ट्रीत हिरोसारखे यश मिळाले. असं असलं तरी त्यांचं करिअर फार यशस्वी राहिलं नाही.दीपक तिजोरी यांचे शिक्षण मुंबईत झाले. त्यांना अभिनयाची आवड होती म्हणून त्यांनी महाविद्यालयीन जीवनातच थिएटर करायला सुरुवात केली. या काळात त्यांनी खूप संघर्ष केला. चित्रपटात येण्यापूर्वी त्यांनी एका मॅजझीनमध्ये एक्झिक्युटिव्ह आणि मुंबईतील 'सी रॉक' हॉटेलमध्ये मॅनेजर म्हणूनही काम केलं. त्यांनी १९८८ मध्ये आलेल्या 'तेरा नाम मेरा नाम' या सिनेमातून करिअरला सुरुवात केली. मात्र, महेश भट्ट यांच्या 'आशिकी' चित्रपटातून या त्यांना नाव आणि प्रसिद्धी दोन्ही मिळाले. यानंतर त्यांनी 'दिल है की मानता नहीं', 'सडक', 'खिलाडी', 'बेटा', 'जो जीता वही सिकंदर', 'बादशाह' यांसारख्या सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केले. आपल्या ३४ वर्षांच्या कारकिर्दीत दीपक तिजोरी १३ वर्षे चित्रपटांपासून दूर राहिले आणि २१ वर्षांत २० पेक्षा जास्त फ्लॉप चित्रपट दिले.दीपक तिजोरी यांनी इंडस्ट्रीत खूप नाव कमावले आहे. त्यांनी क्वचितच मुख्य भूमिका साकारल्या. त्यांना मिळालेल्या बहुतांशी भूमिका या हिरोच्या मित्राच्या किंवा भावाच्या होत्या.



## श्रद्धा कपूर राहणार भाड्याने

बॉलीवूडच्या टॉप अभिनेत्रींपैकी एक म्हणजे श्रद्धा कपूर. 'स्त्री २'ला प्रेक्षकांच्या मिळणाऱ्या पसंतीमुळे सिनेविश्वात श्रद्धा चर्चेत आहे. अशातच आता श्रद्धा तिचे नवे घर घेत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे सगळ्यांचे लक्ष तिच्या नव्या घराने वेधून घेतले आहे. श्रद्धाने नुकतेच हृतिक रोशनचा जुहू येथील आलिशान फ्लॅट भाड्याने घेणार असल्याचे सांगितले जात आहे. याआधी हा फ्लॅट वरुण धवन आणि त्याची पत्नी नताशा दलाल भाड्याने घेणार होते; मात्र काही कारणाने त्यांचा करार होऊ शकला नाही. परंतु, हा सी फेसिंग फ्लॅट आता श्रद्धा कपूर घेत आहे.'हिंदुस्थान टाइम्स'ने दिलेल्या वृत्तानुसार, जुहूच्या ज्या सी फेसिंग अपार्टमेंटमध्ये श्रद्धा घर घेणार आहे, त्या घराचे भाडे ८.५ लाख असल्याचे सांगितले जात आहे. विशेष म्हणजे ज्या अपार्टमेंटमध्ये ती घर घेत आहे, त्याच अपार्टमेंटमध्ये अक्षय कुमारचादेखील ड्युप्लेक्स फ्लॅट आहे. जुहूच्या या अपार्टमेंटमध्ये अक्षय त्याच्या कुटुंबासोबत राहतो. 'स्त्री २'मध्ये या दोघांनी एकत्र काम केले असल्याने श्रद्धा अक्षयच्या शेजारीच घर घेत असल्याची बातमी कळताच चाहत्यांनी तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. सध्या तरी श्रद्धा कपूर तिच्या कुटुंबासोबत राहत आहे.

## म्हणून अक्षयबरोबर काम करण्यासाठी नकार दिला



बॉलीवूड अभिनेत्री कंगना रणौत सध्या त्यांचा नवीन चित्रपट 'इमर्जन्सी'मुळे चर्चेत आहेत. या चित्रपटात कंगना माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची भूमिका साकारत असून मराठमोळा अभिनेता श्रेयस तळपदे हा अटल बिहारी वायपेयी यांच्या भूमिकेत झळकणार आहे. चित्रपटाच्या निमित्ताने एका मुलाखतीत कंगना यांनी अक्षय कुमार बद्दलचा एक किस्सा सांगितला आहे. कंगना म्हणाल्या की, आतापर्यंत मोठ्या बॅनरखाली काम करण्याच्या अनेक ऑफर आल्या, मात्र मी या सगळ्याला कायमच नकार दिला. अक्षय कुमार, सलमान खान आणि संजय लीला भन्साळी यांनी मला अनेकदा त्यांच्या चित्रपटात काम करण्यासाठी विचारणा केली होती. मात्र, मी सगळ्यांना ठामपणे नकारच दिला.'एनबीटी' एंटरटेनमेंटला दिलेल्या मुलाखतीत कंगना रणौत यांनी अक्षय कुमार बरोबरची एक आठवण सांगितली आहे. कंगना म्हणाल्या की, अक्षयने 'सिंह इज ब्लिंग' या चित्रपटातील भूमिकेसाठी मला विचारलं होतं, त्यावेळी मी अक्षयला चित्रपटात काम करण्यासाठी नकार दिला. तेव्हा अक्षयने माझ्या या निर्णयाचा आदर केला होता. त्यानंतर देखील अक्षयने मला त्यांच्या नव्या चित्रपटांसाठी विचारलं होतं, मात्र तेव्हाही मी माझ्या नकारावर ठाम होते. मी सतत नकार देत असल्याने अक्षयने याबाबत मला नकाराचं कारण विचारलं. अक्षय म्हणाला की,"तुम्ही माझ्या प्रत्येक चित्रपटाला नकार का देत आहात? तुम्हाला माझ्याबरोबर काम करण्यात काही अडचणी आहेत का?" तेव्हा मी त्याला सांगितलं की, "तू मला समजून घे. चित्रपटातील जी भूमिका करण्यासाठी तू मला ऑफर देत आहेस, त्या भूमिकेला स्वत:चं असं अस्तित्त्व आहे का? तुम्हालासुद्धा एक मुलगी आहे. या देशातच नाही, तर चित्रपटातसुद्धा मी महिलांना सन्मान मिळावा हीच अपेक्षा करते".कंगना म्हणतात की, चित्रपट हे असं माध्यम आहे, ज्यातून तुमच्या विचारांचा प्रभाव समाजावर पडत असतो.

# रिवाबा जडेजाची पूरग्रस्तांना मदत!

## बीसीसीआयने दुलीप ट्रॉफीचा फॉरमॅट बदलला

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**सध्या श्रीलंका दौऱ्यानंतर भारतीय खेळाडू सध्या विश्रांती घेत आहे. काही खेळाडू कुटुंबियांसोबत वेळ घालवत आहेत तर काही देशांतर्गत क्रिकेटमध्ये व्यस्त आहेत. दुलीप ट्रॉफीमधील संघामध्ये रवींद्र जडेजाची निवड झाली होती. परंतु त्याला संघातून रिलीज करण्यात आले आहे, ज्याचे कारण अद्याप समोर आलेले नाही. दरम्यान जडेजाने त्याच्या फार्म हाऊसमधील फोटो शेअर केले होते. तर त्याची पत्नी पुरात अडकलेल्या लोकांना मदत करण्यासाठी स्वतः कमरेभर पाण्यात उतरली होती, ज्याचे व्हीडिओ समोर आले आहेत.**





गुजरातमधील अनेक भागात पूरस्थिती कायम आहे. रिवाबा जामनगर उत्तरमधून आमदार आहे. या पूरस्थितीत अडकलेल्या लोकांना मदत करण्यासाठी रिवाबा स्वत: कमरेपर्यंत पाण्यात उतरतून परिस्थितीची पाहणी करत होती आणि लोकांना मदत करत होती. रिवाबाने तिच्या सोशल मीडिया हँडलवरून हा व्हिडिओ शेअर केला आहे.या व्हिडिओमध्ये जडेजाची पत्नी कमरेभर पाण्यात उभी असल्याचे दिसत आहे. तिच्या समोरून पाणी वेगाने वाहत आहे. दोन घरांच्या मध्ये शिडी टाकून लोकांना सुरक्षित स्थळी नेण्यात येत होते, याची पाहणी करण्यासाठी रिवाबा तिथे पाण्यात उभी होती. हे काम पाहण्यासाठी पोहोचलेल्या रिवाबाने लोकांशी संवादही साधला. यानंतर शहरातील डीसींना रिवाबा जडेजा भेटण्यासाठी आली. रिवाबाने शेअर केलेल्या व्हीडिओवर रवींद्र जडेजानेही कमेंट केली आहे, खरंच कमाल काम करताय, तुझा खूप अभिमान वाटतोय. रिवाबाने ट्विट करून याबाबत माहिती दिली. ती म्हणाली, 'मुसळधार पावसामुळे झालेल्या विध्वंसाच्या पार्श्वभूमीवर बचाव कार्य आणि अन्न पाकिटांचे वाटप यासाठी जिल्हाधिकारी, आयुक्त आणि संरक्षण अधिकाऱ्यांशी चर्चा केली. ज्यामध्ये गरज असेल तेथे हेलिकॉप्टर वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच प्रभाग ०२ मध्ये असलेल्या पुनित सोसायटीत अडकलेल्या कुटुंबांना बाहेर काढण्याच्या कामाचे प्रत्यक्ष निरीक्षण केले. यावेळी प्रभाग अध्यक्ष प्रज्ञेशभाई भट्ट, नगरसेवक जयराजसिंह जडेजा, जयेंद्रसिंह झाला व कार्यकर्ते उपस्थित होते.१७ एप्रिल २०१६ रोजी रिवाबा आणि जडेजाचे लग्न झाले. २०१७ मध्ये त्यांची मुलगी निधायनाचा जन्म झाला. रिवाबा हिने २०१९ मध्ये गुजरातचे कृषी मंत्री आरसी फाल्दू आणि जामनगरच्या खासदार पूनम मदाम यांच्या उपस्थितीत औपचारिकपणे भाजपमध्ये प्रवेश केला. २०२२ च्या गुजरात विधानसभा निवडणुकीत तिला भाजपकडून तिकीट मिळाले होते. तिने जामनगर उत्तरमधून निवडणूक लढवली आणि आमदार म्हणून निवडूनही आली. गुजरातमधील अनेक भागात पूरस्थिती कायम आहे. रिवाबा जामनगर उत्तरमधून आमदार आहे. या पूरस्थितीत अडकलेल्या लोकांना मदत करण्यासाठी रिवाबा स्वत: कमरेपर्यंत पाण्यात उतरतून परिस्थितीची पाहणी करत होती आणि लोकांना मदत करत होती. रिवाबाने तिच्या सोशल मीडिया हँडलवरून हा व्हिडिओ शेअर केला आहे.या व्हिडिओमध्ये जडेजाची पत्नी कमरेभर पाण्यात उभी असल्याचे दिसत आहे. तिच्या समोरून पाणी वेगाने वाहत आहे. दोन घरांच्या मध्ये शिडी टाकून लोकांना सुरक्षित स्थळी नेण्यात येत होते, याची पाहणी करण्यासाठी रिवाबा तिथे पाण्यात उभी होती. हे काम पाहण्यासाठी पोहोचलेल्या रिवाबाने लोकांशी संवादही साधला. यानंतर शहरातील डीसींना रिवाबा जडेजा भेटण्यासाठी आली. रिवाबाने शेअर केलेल्या व्हीडिओवर रवींद्र जडेजानेही कमेंट केली आहे, खरंच कमाल काम करताय, तुझा खूप अभिमान वाटतोय. रिवाबाने ट्विट करून याबाबत माहिती दिली. ती म्हणाली, 'मुसळधार पावसामुळे झालेल्या विध्वंसाच्या पार्श्वभूमीवर बचाव कार्य आणि अन्न पाकिटांचे वाटप यासाठी जिल्हाधिकारी, आयुक्त आणि संरक्षण अधिकाऱ्यांशी चर्चा केली. ज्यामध्ये गरज असेल तेथे हेलिकॉप्टर वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच प्रभाग ०२ मध्ये असलेल्या पुनित सोसायटीत अडकलेल्या कुटुंबांना बाहेर काढण्याच्या कामाचे प्रत्यक्ष निरीक्षण केले. यावेळी प्रभाग अध्यक्ष प्रज्ञेशभाई भट्ट, नगरसेवक जयराजसिंह जडेजा, जयेंद्रसिंह झाला व कार्यकर्ते उपस्थित होते.१७ एप्रिल २०१६ रोजी रिवाबा आणि जडेजाचे लग्न झाले. २०१७ मध्ये त्यांची मुलगी निधायनाचा जन्म झाला.

### रिवाबा कमरेपर्यंत खोल पाण्यात

ज्यामध्ये गरज असेल तेथे हेलिकॉप्टर वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच प्रभाग ०२ मध्ये असलेल्या पुनित सोसायटीत अडकलेल्या कुटुंबांना बाहेर काढण्याच्या कामाचे प्रत्यक्ष निरीक्षण केले. यावेळी प्रभाग अध्यक्ष प्रज्ञेशभाई भट्ट, नगरसेवक जयराजसिंह जडेजा, जयेंद्रसिंह झाला व कार्यकर्ते उपस्थित होते.१७ एप्रिल २०१६ रोजी रिवाबा आणि जडेजाचे लग्न झाले. २०१७ मध्ये त्यांची मुलगी निधायनाचा जन्म झाला. रिवाबा हिने २०१९ मध्ये गुजरातचे कृषी मंत्री आरसी फाल्दू आणि जामनगरच्या खासदार पूनम मदाम यांच्या उपस्थितीत औपचारिकपणे भाजपमध्ये प्रवेश केला.

# इंग्लंडच्या वर्ल्ड नंबर वन खेळाडूची क्रिकेटधून निवृत्ती

## डेव्हिड मलान याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त जाहीर केली

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**इंग्लंड क्रिकेट संघाचा विस्फोटक फलंदाजाने क्रिकेटला अलविदा केलं आहे. इंग्लंडसाठी सर्व फॉरमॅटमध्ये शतके झळकावणारा माजी फलंदाज डेव्हिड मलान याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त जाहीर केली आहे. ३६ वर्षीय मलानने 'द टाइम्स ऑफ लंडन' या ब्रिटीश वृत्तपत्राला सांगितले की, पांढऱ्या चेंडूच्या फॉरमॅटमध्ये मिळालेल्या यशामुळे तो आनंदी आहे, पण कसोटी क्रिकेटमध्ये तो अपेक्षेप्रमाणे कामगिरी करू शकला नाही.**



मलानने २२ कसोटी, ३० एकदिवसीय आणि ६२ टी-२० सामने खेळले आहेत. २०20 मध्ये तो टी-२० फॉरमॅटमध्ये जगातील अव्वल फलंदाज ठरला. गेल्या वर्षी झालेल्या एकदिवसीय विश्वचषकानंतर तो या फॉरमॅटमध्ये खेळलेला नाही. मलान म्हणाला, 'मी तिन्ही फॉरमॅट खूप गांभीर्याने घेतले पण कसोटी क्रिकेटसाठी खूप मेहनत घ्यावी लागते. पाच दिवसांचे अंतर आणि तयारीचे दिवस. हे मानसिकदृष्ट्या खूप थकवणारे आहे.डेव्हिड मलानने २०१७ मध्ये इंग्लंडकडून पदार्पण केले होते. त्यानंतर त्याने २२ कसोटींमध्ये १०७४ धावा, ३० एकदिवसीय सामन्यांमध्ये १४५० धावा आणि ६२ टी-२० सामन्यांमध्ये १८९२ धावा केल्या आहेत. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये त्याने ८ शतके आणि ३२ अर्धशतके केली आहेत. त्याने आयपीएलमध्ये १ सामनाही खेळला आहे, ज्यामध्ये त्याने २६ धावा केल्या आहेत. मलान आयपीएलमध्ये पंजाब किंग्जकडून खेळला आहे. याशिवाय तो कधीकधी गोलंदाजी करतानाही दिसला. मलानने कसोटीत २ तर एकदिवसीय आणि टी-२० मध्ये १-१ विकेट घेतली आहे.डेव्हिड मलानने टाईम्स ऑफ लंडनला मुलाखत देताना सांगितले की, 'मी मोठा होत असताना कसोटी क्रिकेट माझ्यासाठी नेहमीच शिखरावर राहिले आहे.

### काही वेळा मी चांगला खेळलो:मलान

काही वेळा मी चांगला खेळलो पण काही वेळा मला सातत्यपूर्ण खेळ करता आला नाही, जे निराशाजनक होते कारण मला वाटले की मी यापेक्षा चांगला खेळाडू आहे. मग मी व्हाईट-बॉल फॉरमॅटमध्ये चांगली कामगिरी करत सर्व अपेक्षा ओलांडल्या. "मी तिन्ही फॉरमॅट अत्यंत गांभीर्याने खेळलो, पण कसोटी क्रिकेटची तीव्रता काही वेगळीच होती: पाच दिवस आणि सराव करण्याचे वेगळे दिवस. मला चेंडूंवर मोठे फटके खेळायला आवडतात आणि मी सराव करताना खूप मेहनतही घेतली.